# 'बी व्हेनम' निर्मितीतून मिळवता येतो जास्त अर्थलाभ

**सर्वसाधारणपणे बी व्हेनमची ४००० ते ८००० रु. ग्रॅम याप्रमाणे विक्री करण्यात येते. यावरून या पदार्थाचे किती महत्त्व आहे हे लक्षात येईल. अर्थात बी व्हेनमचे उत्पादनही त्याच प्रमाणात म्हणजे अत्यंत कमी मिळते. ज्या मधपाळाकडे १०० वसाहती असतील त्याला एका वेळेस फक्त २ ते ३ ग्रॅम बी व्हेनम मिळते. एकदा मधमाशीकडून विष गोळा केले तर परत तिच्यामध्ये विष तयार व्हायला १० ते १५ दिवसांचा कालावधी लागतो. म्हणजेच त्याच मधमाशीच्या वसाहतीकडून दर १५ दिवसांनी आपल्याला बी व्हेनम घेता येते.**

**बी** व्हेनम ज्याला आपण मधमाशीचे विष म्हणतो त्याला औषधी उद्योगात मोठ्या प्रमाणात मागणी आहे. अनेक आजारांवर उपचार करण्यासाठी तसेच सौंदर्य प्रसाधने निर्मितीसाठी बी व्हेनमचा वापर केला जातो. बी थेरपी- ॲपिथेरपी म्हणजेच मधमाश्यांच्या विषाचा वापर करून अनेक आजार बरे करण्यासाठीची उपचार पद्धती अनेक देशांमध्ये सुरू आहे. आजही भारतामध्ये बी थेरपी ही संकल्पना अद्याप जास्त रूढ झालेली नाही. परंतु बी व्हेनमचे उत्पादन घेऊन त्याचा वापर मात्र केला जातो, अर्थात याचे प्रमाण कमी आहे. भारतातील ९० टक्के मधमाशी पालन हे फक्त मध उत्पादनासाठीच केले जाते. मधमाशी पालनातून मधाबरोबर पोलन, मेण, प्रोपोलिस, रॉयल जेली आणि बी व्हेनम यासारख्या पदार्थांचे उत्पादन घेतले जाते.

भारतामध्ये मात्र मधापासून मिळणाऱ्या पदार्थांचा विचार केला तर मधाव्यतिरिक्त इतर पदार्थांची निर्मिती फारच कमी प्रमाणात केली जाते. मधमाशी पालनातून मिळणाऱ्या विविध पदार्थांच्या किंमतीचा विचार केला तर त्याचा क्रम बी व्हेनम, रॉयल जेली, प्रोपोलिस, पोलन, मेण आणि मध असा आहे. परंतु आपल्याकडे मात्र याच्या पूर्णपणे उलट काम चालते. म्हणजेच आपले सर्वात महत्त्वाचे उत्पादन म्हणजे मध. मधमाशी पालनातून मात्र फक्त मध उत्पादनच घेतले तर मधमाशी पालन जास्त किफायतशीर होत नाही. याचमुळे भारतामध्ये पाहिजे त्या प्रमाणात मधमाशी पालन व्यवसाय विकसित झाला नाही.

### बी व्हेनम : सर्वात महागडे उत्पादन

बी व्हेनमचा विचार केला तर मधमाशीपासून मिळणारा हा सर्वात महागडा पदार्थ आहे. कारण याचा वापर आजारावर उपचार करणे तसेच सौंदर्यप्रसाधनांमध्ये करण्यात येतो. सर्वसाधारणपणे बी व्हेनमची ४००० ते ८००० रु. ग्रॅम याप्रमाणे विक्री करण्यात येते. यावरून या पदार्थाचे किती महत्त्व आहे हे लक्षात येईल. अर्थात बी व्हेनमचे उत्पादनही त्याच प्रमाणात म्हणजे अत्यंत कमी मिळते. ज्या मधपाळाकडे १०० वसाहती असतील त्याला एका वेळेस फक्त २ ते ३ ग्रॅम बी व्हेनम मिळते. एकदा मधमाशीकडून विष गोळा केले तर परत तिच्यामध्ये विष तयार व्हायला १० ते १५ दिवसांचा कालावधी लागतो. म्हणजेच त्याच मधमाशीच्या वसाहतीकडून दर १५ दिवसांनी आपल्याला बी व्हेनम घेता येते. जी मधमाशी वयस्कर झालेली असते म्हणजेच ४० ते ४५ दिवसांची झालेली असते तिच्यामध्ये विष तयार होते. मधमाशीला ज्यावेळी वाटते की तिला किंवा तिच्या वसाहतीला कोणाकडून तरी धोका आहे; त्यावेळी ती डंख मारून समोरील प्राण्याच्या अंगात काटा रुतवते व विष सोडते. अर्थात त्यावेळी काटा दुसऱ्याच्या शरीरात अडकून राहतो व त्यामुळेच मधमाशी मरते. परंतु बी व्हेनम गोळा करण्यासाठी कृत्रिम पद्धतीचा वापर केला जातो. यासाठी बी व्हेनम कलेक्टर नावाचे उपकरण वापरले जाते.

## विषसंकलनासाठी विद्युत उपकरण

बी व्हेनम कलेक्टर या उपकरणाची सर्वसाधारण किंमत १० ते १५ हजार रुपये असते. हे उपकरण विजेवर चालते. त्यासाठी बॅटरीचाही वापर करता येतो. या उपकरणामध्ये काच व विजेचा शॉक देण्यासाठी तारा असतात. या तारांमधून ९ वॅटचा करंट सोडला जातो. हे उपकरण मधमाशाच्या पेटीच्या प्रवेशद्वाराजवळ ठेवले असता या मधमाशा ज्यावेळी बी व्हेनम कलेक्टरवर बसतात त्यावेळी त्यांना करंट लागतो. त्यांना याची जाणीव होते की तिला तसेच तिच्या वसाहतीला काहीतरी धोका आहे. त्यामुळे ती डंख मारते. हा डंख उपकरणाच्या काचेवर मारल्यामुळे त्या काचेवर मधमाशीच्या डंखातून विष बाहेर येते व ते काचेवर पडते. परंतु यामुळे मधमाशीचा डंख मारण्याचा काटा तुटत नाही, त्यामुळे ती मरतही नाही. काचेवर मारलेल्या डंखामुळे आपल्याला मात्र बी व्हेनम मिळते. बी व्हेनम कलेक्टर हे उपकरण मधमाशीच्या पेटीच्या गेटसमोर ३० मिनिटे ठेवून नंतर ते काढून घेतले जाते. या काचेवर पडलेले सर्व विष हे बारीक रेझरसारख्या मशिनने खरडून काढले जाते. एका स्वच्छ काचेच्या बाटलीमध्ये बी व्हेनम साठवत असताना त्याला आपल्या हाताचा स्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी लागते. बी व्हेनमचे उत्पादन घेऊन त्याला थंड ठिकाणी साठवून ठेवावे लागते.

## प्रतीनुसार मिळतो कमीअधिक दर

बी व्हेनमच्या प्रतीनुसार त्याची ४००० ते ८००० रुपये प्रतिग्रॅम म्हणजेच ४० ते ८० लाख रुपये किलो याप्रमाणे विक्री होते. उत्तर भारतामध्ये बी व्हेनम उत्पादकांच्या काही कंपन्या आहेत. त्या कंपन्या बी व्हेनम मिळविण्यासाठी त्यांची स्वत:ची यंत्रणा वापरून मधमाशी पालकांना काही ठराविक दराने रक्कम देतात. बी व्हेनमचे उत्पादन वर्षभर घेता येते. परंतु ज्यावेळी मधमाशी मध आणि पोलन उत्पादन मोठ्या प्रमाणात देत असते, म्हणजेच ज्यावेळी शेतात मोठ्या प्रमाणात फुलोरा असतो त्यावेळी मधमाशीला तिचे मुख्य काम करू द्यावे. हे काम सर्वसाधारणपणे ऑक्टोबर ते मे- जूनपर्यंत चालते. परंतु ज्यावेळी मधमाश्यांना फुलोरा उपलब्ध नसतो किंवा त्यांना वसाहतीच्या बाहेर काम करता येत नाही, ज्याला आपण दुष्काळाचा काळ म्हणू शकतो. अशा वेळी आपण बी व्हेनम निर्मितीचे काम करू शकतो.

सर्वसाधारणपणे जून- जुलै ते सप्टेंबर या तीन-चार महिन्यांत बी व्हेनमचे उत्पादन घेतले तर दोन फायदे होतात. एक तर या काळात आपल्याला मधमाश्यांच्या वसाहती सुरक्षित आणि सशक्त ठेवण्यासाठी त्यांची काळजी घेणे महत्त्वाचे असते. या काळात त्यांना कृत्रिम खाद्य देऊन त्यांची संख्या व्यवस्थित ठेवली तर येणाऱ्या पुढील हंगामामध्ये मधाचे जास्त उत्पादन मिळते. या मधमाशीच्या दुष्काळाच्या (पावसाळ्याचा हंगाम) काळामध्ये बी व्हेनमचे उत्पादन घेतले तर चांगला फायदा होतो. अर्थात मधमाशी वर्षभर बी व्हेनमचे उत्पादन देऊ शकते. कारण एकदा विष काढल्यानंतर १० ते १५ दिवसांनंतर त्यांच्या शरीरात विषाची निर्मिती होते. १०० वसाहतींपासून वर्षाला ६० ग्रॅम बी व्हेनमचे उत्पादन घेता येऊ शकते. बी व्हेनमचे उत्पादन घेत असताना काचेवर काही घाण, धूळ पडणार नाही याची काळजी घ्यावी. कारण बी व्हेनमचा दर त्याच्या गुणप्रतीवर ठरतो.

## अनेक वर्षांपासून मिळवले जाते डंखविष

बी व्हेनमचा वापर ५,००० वर्षांपासून केला जातो. चीन, कोरिया, रशिया, इजिप्त, ग्रीक यासारख्या देशांमध्ये बी व्हेनमचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. मागील ५० वर्षांमध्ये अनेक देशांमध्ये बी व्हेनमचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अर्थात यामध्ये आपला देश आजही फार मागे आहे. म्हणूनच याला मोठी संधी आहे. बी व्हेनम हा पारदर्शक, आम्लधर्मीय, पातळ पदार्थ असून त्यामध्ये शरीरातील दाहकता कमी करण्याचा गुणधर्म आहे. बी व्हेनममध्ये एन्झाईम्स, ॲमिनो ॲसिड, खनिजे तसेच साखर असते. बी व्हेनममधील मेलिटिन नावाच्या पदार्थामध्ये २६ ॲमिनो ॲसिड्स असतात. बी व्हेनममध्ये ४० ते ६० टक्के मेलिटिन असते. याचबरोबर प्रथिने, ॲपामिन, अडोलॅपिन, फॉस्फोलिपेज, हॅल्युरोनिडेज ॲसिड, फॉस्फेट आणि व्हिटॅमिन हे अत्यंत उपयुक्त घटक असतात. यामुळेच शरीरातील दाहकता, अंगदुखी, संधिवात, मणक्यांचे आजार, स्नायूंचे आजार, मेंदूचे आजार यांसारख्या अनेक आजारांवर उपचार करण्यासाठी बी व्हेनमचा वापर केला जातो. बी व्हेनममध्ये ॲन्टिऑक्सिडंट्सचे प्रमाण चांगले असल्यामुळे त्याचा सौंदर्य प्रसाधनांमध्येही होतो. मधमाशीच्या विषाला सोन्यापेक्षा जास्त दर आहे कारण या बी व्हेनमचा वापर मानवी आरोग्य चांगले ठेवण्यासाठी होतो. म्हणूनच भविष्यात बी व्हेनमच्या निर्मितीद्वारे केलेला मधमाशी पालन व्यवसाय जास्त किफायतशीर होईल.

**(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)**